स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

D:\२०२४-२५\भांडार\लेटर.docx.१२८

जा.क्र. प्रशा/भांडार/सं.दे.दु.ठे./प्र.प/३३२३ /२०२४-२५ दि. :-२७/ १२/२०२४

**प्रसिध्दी पत्रक**

विषय :- संगणक व प्रिंटरचे देखभाल दुरूस्ती ठेक्याचे काम करणेकामी दरपत्रके सादर करणेबाबत.

वरील विषयास अनुसरून सर्व संबंधित ठेकेदार यांना कळविणेत येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेचे मुख्य व उपबाजार कार्यालयातील सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे एकुण संगणक संच - ११४ नग, लॅपटॉप - ७ नग व प्रिंटर - ८३ नग चा देखभाल दुरूस्तीचा नॉन कॉम्प्रेसिव ठेका तीन वर्ष कालावधीसाठी देणेकामी दरपत्रके मागवित आहोत.

सदर काम करणेकामी खालील नियम व अटींचे अधीन राहून आपले कमीत कमी दराचे दरपत्रक सिलबंद पाकीटामध्ये दि. ७ /०१/२०२५ अखेर दु. ३.०० वाजेपावेतो संस्थेच्या भांडार शाखेत पोहोच करावे.

१. दरपत्रकामध्ये फर्मचा जी.एस.टी. क्रमांक, पत्ता, दुरध्वनी क्रमांक नमूद करावा.
२. दरपत्रकामध्ये मूळ दर अधिक जी.एस.टी. दर याप्रमाणे दर नमूद करावेत तसेच दरपत्रकामध्ये कामाचा एच.एस.एन. कोड नमूद करावा.
३. बाजार समितीचे कार्यालयातून देखभाल दुरूस्तीसाठी बोलविलेनंतर तात्काळ हजर राहणे बंधनकारक असेल.
४. सदर ठेका हा नॉन क्रॉम्प्रेसिव असल्याने दुरूस्ती कामासाठी आवश्यक असलेले साहित्य बाजार समिती पुरवठा करेल. बाजार समितीने साहित्य पुरवठा केल्यानंतर ते विनामोबदला बसवून देणे ठेकेदारावर बंधनकारक असेल. तसेच दुरूस्ती कामाच्या आवश्यकतेनुसार आवश्यक असलेले साहित्य प्रचलित घावुक बाजारभावाने बाजार समितीस पुरवठा करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.
५. कामकाजामध्ये हलगर्जीपणा, त्रुटी आढळल्यास कोणतेही कारण न देता सदर ठेका रद्द करणेत येईल.
६. मुदतीनंतर दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
७. दरपत्रक उघडतेवेळी संबंधित पुरवठाधारक / ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधीने बाजार समितीचे मुख्य कार्यालयात वेळेत हजर रहावे.
८. कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समितीने राखून ठेवला आहे.
९. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ७/०१/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात मा. सहसचिव यांचे दालनात दरपत्रके सीलबंद असलेची खात्री करून उघडणेत येतील. दरपत्रके उघडणेचे वेळेत बदल झाल्यास ठेकेदारांना दुरध्वनीव्दारे कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.
१०. नियम व अटी मान्य असणाऱ्या पुरवठाधारकांनीच दरपत्रके सादर करावीत.

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती पुणे.

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७